पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८४३ दिनांक - ०२/१२/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मौजमजेसाठी चोरीच्या मोटार सायकल विक्री करणा-या (एंजन्ट) आरोपीकडुन १५ मोटार सायकली जप्त

कोंढवा पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या गुन्हयाना प्रतिबंध करण्यासाठी तसेच घडलेल्या गुन्हयाचे उकल करण्याचे अनुषंगाने पेट्रोलिंग करुन सीसीटिव्ही फुटेज चेक करुन चोरीची वाहनाचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, यांनी सुचना दिल्या होत्या. सदर सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे,व त्यांचे पथक हद्दीत पेट्रोलींग करीत असताना **पो अं विकास मरगळे, राहुल थोरात, जयदेव भोसले** यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, **निखील सुनिल राक्षे,रा.प्रेमनगर मार्केट यार्ड पुणे** याचे कडे एक होंन्डा शाईन मोटार सायकल असुन त्याच्यावर नंबर प्लेट नाही सदर गाडी ही चोरीची असुन तो ती विक्री करण्यासाठी बोपदेव घाट या ठिकाणी जाणार आहे.

त्यावेळी बोपदेव घाट याठिकाणी वरील स्टाफच्या मदतीने सापळा रचुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे मिळुन आलेल्या मोटार सायकल बाबत तपास केला असता त्याने सदर मोटार सायकल हि त्यास **महेश चव्हाण** नावाच्या इसमाने चोरी करुन विक्री करीता दिली आहे. तसेच तो सदर चोरीची गाडी विक्रीसाठी तो ग्राहक शोधत असल्याची कबुली दिली. सदर आरोपी याने चोरीच्या मोटार सायकल विक्री केल्याचा संशय असल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कडे सखोल तपास केला असता त्याने व महेश चव्हाण याने त्यास २ बुलेट, २ यमाहा, १ केटीएम, ३ युनिकॉर्न, २ ॲक्टिव्हा,१ शाईन अशा मोटार सायकली त्यास महेश चव्हाण याने चोरी करुन विक्री करीता दिल्याची माहिती दिली त्याने काही मोटार सायकली हया इंदापुर भागातील शेतकरी लोकांना कागदपत्रे नंतर देतो असे सांगुन विक्री केल्याचे सांगितले सदर गाडया विकत घेणा-या व्यक्तीकडुन जप्त करण्यात आल्या तसेच काही दुचाक्या ग्राहक मिळे पर्यंत रोडलगत ठिकठिकाणी सोडल्या होत्या त्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत. एकुण ११ मोटार सायकली विक्री करण्यासाठी महेश चव्हाण याचेकडुन घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन ५,५०,०००/- रुपये कि.च्या एकुण ११ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. सदर आरोपीला विश्वासात घेवुन आणखीन तपास केला असता त्याने **सागर शिवाजी गुंजले रा.माण ,सातारा** याचेकडे हि १ युनिकॉर्न, २ पल्सर मोटार सायकल तसेच **गणेश भरत मोहिते, रा.ता.माण, जि.सातारा** याचेकडे १ चोरीची स्प्लेन्डंर मोटार सायकल असुन त्याचे विक्रीसाठी ग्राहक शोधत असल्याची माहिती दिली. त्या माहितीच्या अनुषंगाने सदर इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन हि १,५०,०००/- रु.च्या ३ मोटार सायकल हया जप्त करण्यात आल्या आहेत. वरील तीन ही आरोपी कडुन खालील पोलीस स्टेशनचे मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघड झालेले आहेत.
**कोंढवा पोलीस ठाणे पुणे ८ गुन्हे,वानवडी पो.स्टे.१,गुन्हा राजगड पो.स्टे १ व सासवड पो.स्टे १ गुन्हा (पुणे ग्रामीण), माणगांव पो.स्टे.१, गुन्हा,महाळुंगे एम.आई.डी.सी. पो.स्टे १ गुन्हा,वाठार पोलीस ठाणे सातारा १ गुन्हा**

सदर आरोपीत यांचेकडुन वरील गुन्हयामधील १४ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांचे कडुन जप्त करण्यात आलेल्या यामाहा मोटार सायकल बाबत गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झालेली नाही सदर मोटार सायकली बाबत अधिक तपास चालू आहे.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप आयुक्त परि. ५ पुणे श्री विक्रांत देशमुख,मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.शाहुराव साळवे, कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे)संदिप भोसले, व संजय मोगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे,सहा पोलीस निरीक्षक दिनेश पाटील, पोलीस अंमलदार अमोल हिरवे, राहुल वंजारी सुहास मोरे, राहुल थोरात, जयदेव भोसले, विकास मरगळे, अभिजीत रत्नपारखी, शशांक खाडे, आशिष गरुड, रोहित पाटील, यांनी केलेली आहे.




